# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७०/२०११-१२ दिनांक :

श्री. सुरेश मारुती शिंदे,
मु.पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली. — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली
३) सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली — विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री सुरेश मारुती शिंदे, मु.पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी कवठे महांकाळ उप विभाग विरुध्द तक्रार दि. १५.२.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपली शेत जमीन गट क्र. १५४ येथे नवीन शेतीपंप वीज जोडणी मिळावी यासाठी दि.२२.३.२००८ रोजी वि.प.कडे अर्ज केला. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने विद्युत पुरवठा मंजूर चलन एक महिन्यात मिळणे आवश्यक होते, ते दि. २५.१.२०१२ रोजी मिळाले. ग्राहकाने या मंचाकडे तक्रार क्र. १४९/११ दाखल केली होती, त्यामध्ये दि. ११.१.२०१२ ला सुनावणी होऊन दि. २५.१.२०१२ ला आदेश झाले. त्या दिवशी म्हणजे दि. २५.१.२०१२ रोजी वि.प.ने ग्राहकास चलन क्र. २८४ दिले. वि.प.ने त्या केसमध्ये ग्राहकाने असा अर्ज केला नाही, ग्राहकाकडे असणारी पोच त्यांच्या कार्यालयाची नाही असा बचाव घेतला. त्यास अनुसरुन मंचाचे सदस्य सचिव यांनी पहाणी करुन अर्ज कार्यालयाकडे प्राप्त झाल्याची खात्री केली त्यानंतर ग्राहकास चलन देण्यात आले. कृती मानके विनियमानुसार चलन देण्यास विलंब झाल्यास ग्राहक भरपाई मिळण्यास हक्कदार आहे. या ठिकाणी ग्राहकाने या मंचाने पारीत केलेल्या दि. २५.१.२०१२ च्या आदेशास अनुसरुन कृती मानकांचे पालन योग्य मुदतीत न झालेमुळे विनियमातील तरतुदीनुसार भरपाईची मागणी केली आहे. हा वीज पुरवठा शेतीपंपासाठी असलेने ही भरपाई पूर्ण होण्यास विलंब लागणार असलेने ही भरपाई रोख मिळावी अशी ग्राहकाने मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात कवठे महांकाळ विभागात कर्मचारी अपुरे आहेत, वीज जोडणी देणे, वीज वितरण व्यवस्था निट ठेवणे ह्या कारणामुळे विलंब झालेला असलेने नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये. या मंचाने परतावा वीज बिलातून द्यावा असे आदेश केस क्र. १५०/१० मध्ये दि. २९.१०.२०१० च्या आदेशाने दिले आहे. तसेच कृती मानके विनियम २००५ मधील (१२) Determination of compensation
१२.२ नुसार provided also such compensation shall be paid or adjusted in the consumer's bill issued subsequent to the award of compensation. त्यामुळे रोखीने भरपाई मागणे योग्य नाही असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. १२.४.२०१२ रोजी घेतली असतां, ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता श्री. राखे, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित. श्री. खापरे यांनी ग्राहकाने दि. २२.३.२००८ ला अर्ज दिला, त्याची पोच केस क्र. १४९ मध्ये दाखल केलेली आहे. त्यानंतर १ महिन्यात म्हणजे दि. २२.४.२००८ पर्यंत चलन देणे आवश्यक होते ते दि. २५.१.२०१२ ला देण्यात आले आहे. केस क्र. १४९ मधील दि. २५.१.२०१२ चे आदेश वि.प.ला बजावण्यापूर्वी किंवा त्याचदिवशी ग्राहकास चलन दिले हे स्पष्ट आहे. दि. २२.४.२००८ ते दि. २५.१.२०१२ या कालावधीतील विलंबासाठी कांही ठोस स्पष्टीकरण वि.प.ने आपल्या लेखी अहवालात दिले नाही. उलट, अपुरा कर्मचारीवर्ग, वीज जोडणी देणे, वीज वितरण व्यवस्था निट ठेवणे ह्या कारणामुळे विलंब झालेला असलेने नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये असे म्हणणे दिले आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार १ महिन्यात ग्राहकास चलन दिले नाही, विलंबाबद्दल दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरता येणार नाही. वि.प.ने विलंबाच्या माफीसाठी मा. आयोगाकडे कांही कार्यवाही केली नाही असे दिसते. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक विलंबापोटी भरपाई मिळण्यास हक्कदार आहे. वि.प.ने कृती मानकाची पूर्तता करण्यात कसूर केला आहे, त्यामुळे भरपाई देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार प्रति आठवडा रु. १००/- प्रमाणे प्रति महिना रु.४००/- याप्रमाणे ४५ महिन्याचे रु. १८,०००/- इतकी भरपाई ग्राहकास देणेस वि.प. जबाबदार आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकाच्या म्हणण्यानुसार विद्युत पुरवठा शेतीपंपासाठी असलेने ही भरपाई पूर्ण होण्यास विलंब लागणार असलेने ही भरपाई रोखीने मिळावी, वि.प.ने त्यास हरकत घेतली आहे. भरपाईची रक्कम वीज बिलातून समायोजित करावी असे वि.प.ने आपल्या लेखी अहवालात नमूद केले आहे. तसे कृती मानके विनियम २००५ मधील १२.२ मधील परंतुकानुसार अशा भरपाईचा परतावा करतांना shall be paid or adjusted in the consumer's bill issued subsequent to the award of compensation असे सांगण्याचा प्रयत्न वि.प.ने केला. भरपाईचे समायोजन अधिनियमानुसार प्रथम दोन बिलींग सायकमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी अशी तरतूद आहे. या मंचाने शेकडो केसेसमध्ये असे आदेश केले आहेत. कृती मानके विनियमातील अधिनियम १२.२ नुसार भरपाई ही ग्राहकाच्या नंतरच्या बिलातून समायोजित करण्यात येईल, त्यामुळे ग्राहकाची पूर्ण रक्कम रु. १८,०००/- रोखीने मिळावी ही मागणी मान्य करता येणार नाही.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने ग्राहकास चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे दि. २२.४.२००८ ते दि. २५.१.२०१२ या कालावधीतील विलंबापोटी भरपाई द्यावी. भरपाईच्या रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकास वीज जोडणीनंतर येणाऱ्या बिलींग सायकलमध्ये समायोजित करण्यात यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com